
अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५ । ▶ वर्ष : २३ वे ▶ अंक : २०७ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८



## पाकड्यांना हाकलण्याची तयारी... अमित शहा यांचे फर्मान

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकार पाकिस्तानविरोधात मोठमोठ्या कारवाया करत आहे. याचाच भाग म्हणून, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुक्रवारी देशातील सर्व मुख्यमंत्र्यांशी संवाद साधला आणि त्यांना त्यांच्या राज्यात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवण्याचे निर्देश दिले. ही यादी लवकरात लवकर केंद्राला पाठवावी, जेणेकरुन त्यांचेचे व्हिसा तत्काळ रद्द करता येतील आणि त्यांना भारताबाहेर पाठवता येईल, असेही केंद्राने म्हटले. सरकारने आधीच जाहीर केले आहे की, पाकिस्तानी नागरिकांचे सर्व व्हिसा २७ एप्रिल २०२५ पासून रद्द केले जातील, तर वैद्यकीय व्हिसा २९ एप्रिल २०२५ पर्यंत वैध राहतील. याशिवाय, भारतीय नागरिकांना शक्य तितक्या लवकर पाकिस्तानातून परतण्याचा सल्लाही देण्यात आला आहे.

# युद्धाचे ढग
# सीमेवर रणगाड्यांची जमवाजमव
# भारताचे हायपरसोनिक शस्त्रदेखील सज्ज

**नवी दिल्ली : पहलगाम हल्ल्याचा बदला भारताकडून घेतला जाणार ही भीती पाकिस्तानला सतावत आहे. त्या भीतीतूनच पाकचे सत्ताधीश भारताच्या सीमेवर रणगाडे, मिसाईल आदी शस्त्रास्त्रे सीमेवर पाठविण्यास सुरुवात केली आहे. एकप्रकारे पाकिस्तान युद्धाची तयारी करू लागला आहे.भारताने शुक्रवारी हायपरसोनिक क्षेपस्त्राची चाचणी यशस्वी केल्यामुळे पाकिस्तानचे धाबे दणाणणार आहे.**

भारत पाकिस्तानमध्ये प्रचंड तणाव निर्माण झाला आहे. हल्ला करणारे दहशतवादी अद्याप सापडलेले नाहीत. पाचपैकी तीन भारतीय आहेत, तर दोन पाकिस्तानी आहेत. या सर्वांचा शोध घेतला जात आहे. हल्ला झाल्यानंतर काही वेळातच पाकिस्तानी हवाई क्षेत्रात पाकिस्तानी लढाऊ विमाने घिरट्या घालू लागली होती. ही त्यांची कृती नेहमीची नव्हती. तसेच भारतीय सीमेजवळून टेहळणी विमानही गेले होते. आता पाकिस्तान भारताच्या सीमेवर मोठ्या प्रमाणावर शस्त्रे आणत असल्याचे समोर येत आहे.

सोशल मीडियावर काही व्हिडीओ व्हायरल होऊ लागले आहेत. यामध्ये पाकिस्तानी सैन्य सीमेवर मोठ्या प्रमाणावर हालचाली करत आहे. दोन अतिरिक्त रेजिमेंट तैनात करण्यात आल्या आहेत. तसेच टँक, चिलखती, वाहनेदेखील मोठ्या संख्येने सीमेकडे नेली जात आहेत. लढाऊ विमाने कमी उंचीवरून उडण्याचा सराव करत आहेत.

### भारताकडूनही जय्यत तयारी...

पाकिस्तानने तिकडे तयारी सुरु केलेली असताना भारतानेही तयारी सुरु केलेली आहे. हवाई दलाने राजस्थानमध्ये युद्धाभ्यास सुरु केला आहे. यामध्ये राफेल लढाऊ विमाने देखील सहभागी झाली आहेत. हवेतून सपाट जमिनीवर तसेच डोंगररागांमध्ये हल्ला करण्याचा अभ्यास सुरु करण्यात आला आहे. याचे नाव आक्रमण असे ठेवण्यात आले आहे. तसेच भारतीय सैन्याला सीमेवर अलर्टवर ठेवण्यात आले आहे.

### पाक सैन्य घाबरले

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या ४८ तासांच्या आत भारताने युद्धनौका आयएनएस सूरतवरुन क्षेपणास्त्र चाचणी केली. यामुळे अरबी समुद्रात पाकिस्तानी नेव्हीला कडक संदेश मिळाला. याशिवाय, केंद्राने हवाई दल आणि सैन्याला तयार कुठल्याही परिस्थितीसाठी तयार राहण्याचे आदेश दिले आहेत. यामुळेच पाकिस्तानी सैन्यात प्रचंड अस्वस्थता पसरली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, पाकिस्तानी लष्करप्रमुखांसह पाकिस्तानच्या अनेक लष्करी अधिकाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबियांना खासगी विमानाने ब्रिटन आणि न्यू जर्सीला पाठवले आहे.



भारताने डेस्ट्रॉयर मिसाईल चाचणीनंतर आता हायपरसोनिक शस्त्र देखील सज्ज ठेवले आहे.



पाकिस्तानकडून सीमेवर रणगाडे उभे करण्यात आले आहे. सेनेना चिलखती दिल्या जात आहेत.

### हायपरसोनिक शस्त्र सज्ज

**नवी दिल्ली :** भारत आता पाकिस्तानला सडेतोड प्रत्युत्तर देण्याच्या तयारीत दिसत आहे. शुक्रवारी हायपरसोनिक शस्त्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या अ‍ॅडव्हान्स्ड स्क्रॅमजेट कनेक्टेड टेस्ट फॅसिलिटी (डउझढ) ची यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे. याआधी गुरुवारी भारतीय नौदलाने अरबी समुद्रात या क्षेपणास्त्राची चाचणी घेतली होती. डीआरडीओने म्हटले आहे की, हैदराबादस्थित डीआरडीएल प्रयोगशाळेने हायपरसोनिक शस्त्र तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. डीआरडीएलने २५ एप्रिल २०२५ला हैदराबाद मध्ये नव्याने निर्माण केलेल्या अ‍ॅडव्हान्स्ड स्क्रॅमजेट कनेक्टेड टेस्ट फॅसिलिटी (एससीपीटी) येथे १००० सेकंदांपेक्षा जास्त कालावधीसाठी अ‍ॅक्टिव्ह कूल्ड स्क्रॅमजेट सबस्केल कम्बस्टरची ग्राउंड टेस्टिंग केली. आजच्या यशस्वी चाचणीसह ही प्रणाली लवकरच संपूर्ण ताकदीने कॉम्बस्टर चाचणीसाठी तयार होणार आहे.

## डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्येप्रकरणात
# मनीषा मानेचा १४ दिवस न्यायालयीन कोठडीत मुक्काम

**सोलापूर :** डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्या प्रकारणातील आरोपी मनीषा मुसळे माने हिला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. तिथे आता तिचा मुक्काम असणार आहे. ५ दिवसांची पोलीस कोठडी पूर्ण झाल्यानंतर संशयित आरोपी मनीषा मानेला न्यायालयीन कोठडी देण्याची विनंती तपासाधिकाऱ्यांनी केली होती. पुन्हा पोलीस कोठडी मागण्याचे हक्क अबाधित ठेवत न्यायालयीन कोठडी देण्याची तपासअधिकाऱ्यांची न्यायालयात मागणी केली होती. त्यानुसार तिला या कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले. शुक्रवार (ता.२५) संशयित माने हिला न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते.

दरम्यान डॉ. वळसंगकर आत्महत्याप्रकरणाचा तपास सदर बझार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजित लकडे यांच्यासह त्यांच्या टिमकडून युध्दपातळीवर सुरु असली तरी गृहकलाच्या दिशेने तपासाची दिशा पोलिसांची नसल्याने



सोलापूर शहर-जिल्ह्याच्या समाजमनातून पोलिसांबद्दल संताप व्यक्त केला जात आहे.

सरकारी पक्षाची बाजू ऐकत सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयातील मुख्य न्यायादंडाधिकारी विक्रमसिंह भंडारी यांनी मनीषा मानेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्येप्रकरणी नवनवीन माहिती समोर येत असून, हॉस्पिटलमधील २७ कर्मचाऱ्यांनी आरोपी मनीषा माने हिच्या विरोधात तक्रारी दाखल केल्या आहेत. या तक्रारींच्या अनुषंगाने, सदर बझार पोलिस ठाण्याच्या पोलिसांकडून तपास सुरू आहेत. याशिवाय फिर्यादी डॉ. अश्विन वळसंगकर, शोनाली वळसंगकर आणि इतर संबंधित व्यक्तींचेही जबाब पोलिसांकडून नोंदवले जात आहेत. संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास सुरु असून, लवकरच डॉ. वळसंगकर यांच्या आत्महत्येच्या खऱ्या कारणांचा उलगडा होईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

शुक्रवारी (१८ एप्रिल) रात्री ८ वा. एस.पी ऑफ न्युरो सायन्सेस येथे रुग्णांची तपासणी करून घरी परतले. रात्री ८:३० बेडरूमच्या बाथरूममधून बंदुकीच्या गोळीचा आवाज आला. त्यानंतर दुसरी राउंड फायर झाल्यावर कुटुंबीयांनी बेडरूममध्ये धाव घेतली. यावेळी डॉ. शिरीष वळसंगकर हे रक्ताच्या थारोळ्यात माखलेले दिसले. रात्री ९ वा. त्यांच्याच रुग्णालयामध्ये डॉ. शिरीष वळसंगकर यांना दाखल करण्यात आले. रात्री १०:२० मिनिटांनी डॉ. वळसंगकर यांना मृत घोषित करण्यात आले.

(अधिक वृत्त पान ८ वर)

# सोलापुरात २५ पाकिस्तानी नागरिक : गोरे



**माढा-सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यात साधारणतः २५ च्या आसपास पाकिस्तानी नागरिक आहेत. त्यापैकी लाँगटाईम व्हिसा असलेले १०-११ लोक आहेत. १४ लोकांना परत पाठवण्यासारखी परिस्थिती आहे. माझी पोलिस आयुक्तांशी चर्चा झाली आहे, ते सिंधी-हिंदू आहेत. ज्या हिंदू बांधवांना पाकिस्तानमध्ये त्रास होतो, त्या त्रासाला कंटाळून आलेले काही लोक असू शकतात, जर ते हिंदू असतील तर त्यांच्याबद्दल आपल्याला विचार करावा लागेल. मी माझी भूमिका सरकारकडे मांडेन. यासंदर्भात मी आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलणार आहे. त्या संदर्भात काय निर्णय घ्यायचा आहे, त्याचा विचार करण्यात येईल, असे गोरे म्हणाले.

पेहलगाम (श्रीनगर) येथे पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याचा देशाने नव्हे तर संपूर्ण जगाने निषेध केला आहे. यदाकदाचित युद्ध झालेच तर पाकिस्तान जगाच्या नकाशावरून नष्ट करू, अशी प्रतिक्रिया जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शुकवारी येथे पत्रकारांशी बोलताना दिली.

गृहमंत्री अमित शहा तेथे तळ ठोकून आहेत. त्यांच्या संपर्कात मुख्यमंत्री आहेत. आणि सर्वांनी तेथे जाऊन अशा परिस्थितीत यंत्रणेला कामाला लावण्यापेक्षा आहे त्या परिस्थितीत तेथील व्यवस्था चोख ठेवण्यासाठी मुख्यमंत्री प्रयत्नशील असल्याचे गोरे यांनी सांगितले.

जनतेची कामे करायची असतील तर भाजपाच्या सोबत गेले पाहिजे अशी मानसिकता अनेक आमदारांची आहे. यासाठी अनेकजण सोबत आले आहेत, अनेक जणांनी येण्याची इच्छा व्यक्त केली आहे. याबाबत मुख्यमंत्री निर्णय घेतील. सोलापूर जिल्ह्यातील कोण आमदार संपर्कात आहेत असे विचारल्यावर सोलापूरपासून कर्नाटकापर्यंत अनेक जण आहेत अशी गुगली पालकमंत्र्यांनी टाकली.

### विमान उड्डाणाची गोड बातमी लवकरच कळेल

विमानसेवेच्या अनुषंगाने आम्ही सोलापूरकरांना गोड बातमी दिलेली आहे. सोलापूरला विमान उड्डाणाची परवानगी मिळालेली आहे. फ्लाय ९१ ही कंपनी विमानसेवेला तयार आहे. मात्र, कंपनीचे म्हणणे आहे की, पाहिले उड्डाण गोव्याला करू, तर आमचे म्हणणे आहे की, ते मुंबईला करावे. त्याबाबत आमची त्यांच्यासोबत चर्चा सुरू आहे, ते अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे विमान उड्डाणाची गोड बातमी लवकरच कळेल, असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पुन्हा एकदा सांगितले.

### जिल्ह्यात कुठेही पाणी कमी पडू दिले जाणार नाही

टंचाई आराखड्याबाबत गोरे म्हणाले, दुष्काळासंदर्भात जिल्हाधिकारी, सीईओ, बीडीओ ग्रामसेवकांपासून सर्वांना सक्त सूचना दिल्या आहेत. ज्या ज्या ठिकाणी पाण्याची गरज आवश्यकता आहे. तसेच, पिण्याच्या पाण्याची गरज आहे, त्या त्या ठिकाणी पाणी टँकर आणि इतर पर्यायाबाबत सूचना दिल्या आहेत.




## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे





वक्तसे पहीले और नसीबसे जादा किसीको कुछ नही मिलता!

# सावरकरांविषयी पुन्हा असे बोलला तर आम्हीच दखल घेवू
## सुप्रीम कोर्टाकडून राहुल गांधींची खरडपट्टी

**नवी दिल्ली :** कोर्टाने शुक्रवारी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची चांगलीच खरडपट्टी काढली. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी वादग्रस्त विधाने केल्याप्रकरणी कोर्टात झालेल्या सुनावणीवेळी कोर्टाने महात्मा गांधी, इंदिरा गांधी यांचा उल्लेख करत राहुल गांधींना फटकारले. पुन्हा अशी विधाने केली तर आम्ही स्वत:हून त्याची दखल घेऊ, असा इशाराही कोर्टाने त्यांना दिला आहे.

महाराष्ट्रातील अकोला येथील एका सभेमध्ये राहुल गांधींनी सावरकारांचा जाणीवपूर्वक अपमान केल्याचा आरोप करत वकिल नृपेंद्र पांडे यांनी त्यांच्याविरोधात उत्तर प्रदेशातील सत्र न्यायालयात खटला दाखल केला आहे. न्यायालयाने राहुल यांना समन्स बजावले होते.



त्याविरोधात त्यांनी अलाहाबाद हायकोर्टात धाव घेतली होती. पण कोर्टाने त्यांची मागणी फेटाळली.

अलाहाबाद हायकोर्टात दिलासा न मिळाल्याने राहुल यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेत समन्स रद्द करण्याची मागणी केली होती. त्यावर शुक्रवारी सुनावणी झाली. सुनावणी दरम्यान न्यायालयाने राहुल यांना धारेवर धरले. तुम्ही एका राजकीय पक्षाचे नेते आहात. तुम्ही अशी विधाने का करत आहात? तुम्ही महाराष्ट्रात जाऊन सावरकर यांच्याविषयी बोलता, जिथे त्यांची पूजा केली जाते. तुम्ही असे करायला नकोय, असे कोर्ट म्हणाले.

| | |
|---|---|
| संगम श्री डे | 138-27-278 |
| संगम श्री नाईट | 478-90-569 |
| कल्याण | 490-34-789 |
| मुंबई | 460-00-136 |